# काश्मीरमधील तीर्थस्थानाची दंतकथा

धनंजय देव

धगधगते अग्नीकुंड बनलेल्या काश्मीरकडे गेल्या काही वर्षांपासून पाश्चिमात्य देशातील पर्यटकांनी पाठ फिरवली आहे. मात्र कोणताही झगमगाट नसलेल्या एका छोटेखानी तीर्थस्थानाकडे जे रोझाबल वस्तीत वसले आहे, तेथे परदेशी पर्यटकांचा ओढा वाढतच आहे. मध्यकालीन यवनी संत युझ असफ यांची समाधी रोझाबालमध्ये आहे. मात्र त्या समाधीचा येशू ख्रिस्ताच्या थडग्याशी बादरायण संबंध जोडला जाण्यासाठी कित्येक दंतकथा आहेत. अश्विन सांघी यांनी द रोझबल लाईन या कादंबरीत या दंतकथेचा उपयोग केला आहे आणि त्याचा परिपाक म्हणून श्रीनगरमधील ह्या तीर्थस्थळी पर्यटकांची रीघ लागली आहे.

ही प्रसिद्धी एवढी कळसाला पोहचली की तेथील कर्मचाऱ्यांना विदेशी पर्यटकांसाठी तीर्थस्थळाचे दर्शन बंद करावे लागले. अन्यथा स्थानिकांच्या भावना दुखावण्याची शक्यता होती. येशू ख्रिस्ताने क्रुसावरील मरणावर विजय मिळवला. काश्मिरपर्यंत प्रवास करून युझ असफ हे नाव धारण केले व त्यांना रोझाबाल येथे समाधी देण्यात आली असे अनेक जण मानतात. हे तीर्थस्थळ व दस्तुरखुद्द अश्विन सांघींचे रोमांचकारक लिखाण द रोझाबाल लाईन यामुळे पर्यटक प्रभावीत झाले आहेत. लोनली प्लॅनेट गाईडमध्ये याचे वर्णन आले आणि पाश्चिमात्यांचे कुतूहल पुन्हा उचाळून आले.

संघींच्या ह्या काल्पनिक कथेचा सार म्हणजे येशू ख्रिस्ताने क्रुसावरील मरणावर विजय मिळविला आणि काश्मिरपर्यंत




मजल मारली. विक्रीचे नवनवीन उच्चांक गाठत असलेल्या संघींच्या ह्या कादंबरीतील प्रत्येक पानावर वाचक बुचकळ्यात पडतो. मात्र त्याचबरोबर लेखक हे सुद्धा विशद करतात की वाचकाने त्याकडे इतिहास म्हणून नव्हे तर एक कथा म्हणून पहावे.

खरंच येशू ख्रिस्त भारतात आले काय? मेरी मान्दालेयचे मगध देशाशी काही संबंध आहे का? अब्राहम आणि ब्रह्म म्हणजे दोन रूपे नसून एकच आहे? अशा प्रश्नांची अश्विन संघींनी आपल्या रोझाबाल लाइनच्या नवीन पेपरबॅक आवृत्तीत उकल करण्याचा प्रांजळ प्रयत्न केला आहे. धर्म आणि कटकारस्थानाच्या सिद्धांताचा तुलनात्मक मिलाफ म्हणजेच पुस्तकातील काल्पनिकतेची डॅन ब्राऊनच्या दा विन्ची कोडशी तुलना झाली आहे. तथापि निकोलस नोटोविच यांच्या 'द अननोन लाईफ ऑफ ख्रिजस' ह्यासह बऱ्याच पुस्तकांवर ऐतिहासिक कल्पना आधारली आहे.

जगभरातील धर्मांधर्मात असलेल्या परस्पर संबंधाविषयी लेखकाला जे आकर्षण आहे, तेच द रोझाबाल लाईन शब्दबद्ध होण्यामागचे प्रेरणास्थान आहे. एक धर्म दुसऱ्या धर्माशी कसा जोडलेला आहे व त्यामधील जोडले गेलेले दुवे व सांधे कसे परस्पर पूरक आहेत त्याचा पुरावा म्हणून ही कादंबरी आपल्याला मेसापोटेमिया ते मगध, जेरुसलेम ते रोम येथपर्यंत फिरवून आणते. 'भगवान बुद्ध आणि येशू ख्रिस्तांनी चाळीस दिवस केलेला उपवास, ख्रिस्ती धर्मात दिला जाणारा बाप्तिस्मा व कुंभ मेळ्यामधील साधर्म्य मला अतुलनीय वाटते, असे रोमांचित झालेले अश्विन सांघी म्हणतात.

प्रकाशनासाठी संघींना खडतर प्रयत्न करावे लागले. 'मला प्रकाशकच मिळत नव्हते. पहिली आवृत्ती मला स्वखर्चाने काढावी लागली, असे ते उघडपणे म्हणतात. नशिबाने टाटा वेस्टलॅन्डला ह्या कादंबरीत काहीतरी गुण आढळला आणि दुसरी आवृत्ती सन २००८ मध्ये प्रकाशित झाली आणि आजतागायत विक्रीत ही कादंबरी आघाडीवर राहिली आहे. श्रीनगरमधील द रोझाबाल समाधी स्थळी येशू ख्रिस्तांना समाधी देण्यात आली आहे, या वादाच्या मुद्यावर ही कादंबरी आधारित आहे, असे वर्णन द लोनली प्लॅनेट गाईड टू इंडियामध्ये करण्यात आले. त्यामुळेच शेकडो पर्यटकांनी त्या समाधी स्थळाचे दर्शन घेण्यासाठी रीघ लावली. त्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांना समाधीचे दर्शन घेण्यावर भाविकांना बंदी घालण्यावाचून गत्यंतर उरले नाही. ह्या काल्पनिक कथेवर निदान त्यांचा तरी विश्वास आहे का? त्यावर लेखक फक्त स्मितहास्य करतात. या पुस्तकाला वाचकांकडून मात्र प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे.

द रोझाबाल लाईन
लेखक- अश्विन सांघी
प्रकाशक- वेस्टलँड प्रकाशन
पृष्ठे- ३६२, मूल्य- २२५

## टिवल्या बावल्या

विजय पराडकर

